





लोकमत वृत्तपत्र समूहातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेल्या टी-शर्टचे सादरीकरण करताना एलआयसीचे वरिष्ठ क्षेत्रीय प्रबंधक प्रदीप शेनॉय, संदीप युनिव्हर्सिटीचे कुलगुरू कर्नल प्रा. एन. रामचंद्र, पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, 'लोकमत'चे सहायक उपाध्यक्ष बी. बी. चांडक, नाशिक ॲथलेटिक असोसिएशनचे राजीव जोशी, आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत.



आकार वेल्फेअर फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी नाशिक महामॅरेथॉन स्पर्धेत सहभाग निश्चित केला. या प्रसंगी संस्थेच्या अनिता पाटील, जया आढाव, स्मिता पाटील, संगीता जाधव, वैशाली सोनवणे आदी.

## सेल्फी काढा बक्षीस मिळवा : आजपासून सात ठिकाणी नावनोंदणी

# सेल्फीचा आनंद अन् नावनोंदणीची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : लोकमत वृत्तपत्र समूहाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेच्या निमित्ताने लोकमतच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून गुरुवार, दि. १४ पासून शहरातील तीन महत्त्वाच्या ठिकाणी सेल्फी पॉइंट्स उभारण्यात येणार आहे, तर सहा ठिकाणी नाव नोंदणीची व्यवस्था करण्यात आली आहे. १९ तारखेपर्यंत नाशिककरांना या सेल्फीचा आनंद आणि नावनोंदणीची संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे उत्कृष्ट सेल्फी पिकला आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहे.

आरोग्य जागृतीचा संदेश देण्याबरोबरच ॲथलेटिक्स खेळाला प्रोत्साहन मिळावे यासाठी लोकमत वृत्तपत्र समूहातर्फे येत्या ८ ऑक्टोबर रोजी 'नाशिक महामॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने नाशिककरांना या मोहिमेत सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने शहरात सेल्फी पॉइंट उपक्रम राबविण्यात येत आहे. नाशिककरांच्या सहभाग आणि सहकार्यातून सदर महामॅरेथॉन होणार असून, क्रीडा जगताचे या मॅरेथॉनकडे लक्ष लागून आहे. या स्पर्धेतून थेट मुंबई येथील मॅरेथॉनसाठी पात्रता मिळणार असल्याने नाशिककरांमध्ये या स्पर्धेविषयी प्रचंड उत्सुकता आहे.

गोल्फ क्लब जॉगिंग ट्रॅक, साधना मिसळ, दंडे ज्वेलर्स या तीन ठिकाणी सेल्फी पॉइंट उभारण्यात आले आहेत. नाशिककरांनी या ठिकाणी सेल्फी काढून तो ९०२८६९०६९२ व ७५०७९२२१८५ या क्रमांकावर पाठविल्यास उत्कृष्ट सेल्फीला आकर्षक भेटवस्तू दिली जाणार आहे. teameventnsk@gmail.com या संकेतस्थळावरही सेल्फी पाठविता येणार आहे. १९ तारखेपर्यंत शहरात हा उपक्रम राबविला जाणार असून, जास्तीत जास्त नाशिककरांनी सेल्फी झोनमध्ये आपले छायाचित्र काढून ते लोकमतच्या वरील क्रमांकावर पाठविल्यास त्यांना बक्षीस जिंकण्याची संधी आहे. महामॅरेथॉनसाठी नावनोंदणी जोरात सुरू असून, काही ठिकाणी विशेष स्टॉल्स उभारण्यात आले होते. या ठिकाणी नाशिककरांनी भरभरून प्रतिसाद दिल्यानंतर आता शहरात सहा ठिकाणी नाव नोंदणीची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गोल्फ क्लब मैदान, सुयोजित जॉगिंग ट्रॅक, कृषिनगर जॉगिंग ट्रॅक, इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक, साधना मिसळ आणि संभाजी स्टेडियम या सर्व ठिकाणी नावनोंदणीची व्यवस्था करण्यात आली आहे. १९ तारखेपर्यंत नाशिककरांना या स्पर्धेसाठी नावनोंदणी करता येणार आहे. या आठ ठिकाणांव्यतिरिक्त ऑनलाइन आणि ऑफलाइनही नोंदणी करता येणार आहे. लोकमतच्या कार्यालयात संपर्क साधल्यानंतरही स्पर्धेची माहिती मिळू शकते.



अमोद गुप्ता, सेंटर हेड रिजोनन्स एज्युकेशन व्हेंचर प्रा. लि.




पी.के. सिंग, अध्यक्ष, स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र



संकेत भावसार, मॅरेथॉन धावपटू

- आपल्या ग्रुपलाही 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेसाठी सहभागी व्हायचे असल्यास '८९९९५३५३०६' या क्रमांकावर फोन करा.
- स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी www.mahamarathon.com/nashik या संकेतस्थळावर भेट द्या.
- 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेबद्दल आपणास असलेल्या विविध शंका तसेच सूचना आम्हाला asknashik @ mahamarathon. com या मेल आयडीवर मेल करा.



नाशिक सिटी केटरिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनीही नाशिक महामॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला.

### गोल्फ क्लबपासून रंगणार स्पर्धा

- रविवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी नाशिकमध्ये महामॅरेथॉनची स्पर्धा रंगणार आहे. गोल्फ क्लब मैदान येथून स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. यामध्ये २१, १०, ५ आणि ३ कि.मी. अंतर अशी स्पर्धा रंगणार आहे. २१ कि.मी., १० कि.मी. ५ कि.मी. फन रन आणि ३ कि.मी. फॅमिली रन अशा विविध गटांत सदर स्पर्धा रंगणार आहे. २२ तारखेपर्यंत स्पर्धेसाठी नावनोंदणी केल्यास विशेष सवलत दिली जाणार असल्याने जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदविण्याला प्राधान्य दिले

Associate Sponsors | T-Shirt Partner | Food & Beverage Partner | Hospitality Partner | Ethnic Partner | Pride Partners
Health Partner | Goodie Bag Partner | Health Mapping Partner | Partners | Official Energy Drink Partner | Sporting Accommodation Partner | Logistics Partner | Health & Fitness Partner | Radio Partner | Outdoor Partner | Supported By